दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक -२९३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : २१ जुलै २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : अष्टमी तिथी (२२ जुलै पहाटे ०५:१६ पर्यंत) त्यानंतर नवमी तिथी नक्षत्र : चित्रा नक्षत्र (रात्री ०८:४८ पर्यंत) त्यानंतर स्वाती नक्षत्र योग : सिद्ध योग (सायंकाळी ०६:२४ पर्यंत) त्यानंतर साध्य योग करण : विस्ती भद्रा करण

### अजित डोवाल यांना यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार

**पुणे :** राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पुणे: देशाच्या राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेला बळकटी देण्याबरोबरच दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी मोलाची भूमिका बजावणारे आणि गुप्तचर विभागाचे एक दशकाहून अधिक काळ नेतृत्व केलेले राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना यंदाचा 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

## सारांश वृत्त

### राम मंदिरातील व्यवस्था पुन्हा बदलली; आता ड्ड्खच्या देखरेखीत होणार दानाच्या रकमेची मोजणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राम मंदिरातील दान चोरी प्रकरणी नवनवीन खुलासे समोर येत आहेत. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. यावर सुनावणी सुरू आहे. यातच आता राम मंदिरातील व्यवस्थेत पुन्हा एकदा बदल करण्यात आला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या देखरेखीखाली दान-देणगीची रक्कम मोजली जाणार आहे.

राम मंदिरासाठीच्या दानात अनियमितता उघडकीस आल्यानंतर श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने रोख रक्कम मोजण्याच्या पद्धतीत मोठे बदल केले आहेत. आता स्टेट बँक ऑफ इंडिया (ड्ड्ख) अयोध्येतील राम मंदिरात मिळालेल्या रोख देणग्यांच्या मोजणीची देखरेख करेल. या कामासाठी दोन शिफ्टमध्ये एक नवीन टीम तैनात करण्यात आली आहे. मंदिर आणि बँकेच्या सूत्रांनी याला दुजोरा दिला आहे. देखरेख प्रणाली अधिक मजबूत करण्यासाठी, ट्रस्टने मोजणी प्रभारी म्हणून एका माजी लष्करी अधिकाऱ्यासह ४ पर्यवेक्षकांची नियुक्ती केली आहे. याने संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढेल, असा ट्रस्टचा विश्वास आहे. नवीन प्रणाली लागू करण्यापूर्वी सुमारे एक आठवडा तिची चाचणी घेण्यात आली. यशस्वी चाचणीनंतर, रविवारी नवीन प्रणाली लागू करण्यात आली. याव्यतिरिक्त, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने दानपेट्यांमधील रोख रक्कम मोजण्याचे काम अधिकृतपणे स्टेट बँक ऑफ इंडियाकडे सोपवले आहे. रोख रक्कम मोजण्यासाठी दोन शिफ्टची प्रणाली लागू करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक शिफ्टमध्ये १० ते १२ लोकांचा चमू असेल.

# हा केवळ गुन्ह्याचा विषय, याचे राजकारण करू नका : सर्वोच्च न्यायालय

## आता न्याय फक्त आरोपींनाच नव्हे, तर कोट्यवधी भाविकांनाही हवा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

अयोध्येतील राम मंदिरातील कथित देणगी अपहार प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (२० जुलै २०२६) महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत स्पष्ट केले की, हे केवळ गुन्ह्याचे प्रकरण आहे, त्याचे राजकारण करू नये. न्यायालयाने याचिकाकर्त्यांना आणि संबंधित पक्षांना या विषयाचे राजकीय भांडवल न करण्याचा सल्ला देतानाच, निष्पक्ष आणि प्रभावी चौकशी होणे हीच न्यायालयाची प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले. त्याचबरोबर उत्तर प्रदेश सरकारकडून सुरू असलेल्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) तपासाची माहितीही न्यायालयाने मागवली आहे.

ही भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे. कारण श्रद्धेशी संबंधित कोणत्याही संस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी ही कायद्याच्या चौकटीत आणि निष्पक्षपणेच व्हायला हवी. मात्र, या प्रकरणामुळे देशभरातील कोट्यवधी रामभक्तांच्या मनात निर्माण झालेले प्रश्न दुर्लक्षित करून चालणार नाहीत.

राम मंदिर हा केवळ एक धार्मिक प्रकल्प नाही, तर देशातील लाखो-कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचे केंद्र आहे. अनेक दशकांच्या आंदोलनानंतर मंदिराची उभारणी झाली. विविध राजकीय पक्षांनी, विशेषतः सत्ताधारी पक्षाने, राम मंदिराला आपल्या राजकीय आणि वैचारिक भूमिकेचा केंद्रबिंदू बनवले. अशा परिस्थितीत मंदिरातील देणग्यांच्या कथित अपहाराची घटना समोर येणे ही केवळ आर्थिक अनियमिततेची बाब राहत नाही, तर ती सार्वजनिक विश्वास, धार्मिक भावना आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाशी संबंधित गंभीर बाब ठरते.

सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकांमध्ये या प्रकरणाची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी, केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत तपास, न्यायवैद्यकीय आर्थिक लेखापरीक्षण तसेच श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना एसआयटीच्या तपासाची माहिती सादर करण्यास सांगितले. सरकारच्या बाजूने सांगण्यात आले की, एसआयटी आधीच कार्यरत असून उत्तर प्रदेश पोलीस तपास करत आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ जुलै २०२६ रोजी होणार आहे.

तपासात आतापर्यंत आठ आरोपींना अटक, सुमारे ८० लाखांची कथित अपहाराची रक्कम जप्त, तसेच ट्रस्टचे दोन वरिष्ठ पदाधिकारी राजीनामा देण्यास भाग पाडले गेल्याची माहिती समोर आली आहे. एसआयटीने अंतरिम अहवाल सादर केल्यानंतर तपासाला वेग आल्याचेही न्यायालयात सांगण्यात आले. परंतु, येथे सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, कायद्याने आरोपींवर कारवाई होईल; पण कोट्यवधी भाविकांच्या दुखावलेल्या श्रद्धेला न्याय कसा मिळणार? देशभरातून रामाच्या चरणी अर्पण झालेली देणगी ही केवळ आर्थिक व्यवहार नसून ती विश्वास, आस्था आणि भक्तीचे प्रतीक आहे. जर त्या देणगीच्या व्यवस्थापनावरच प्रश्नचिन्ह उभे राहत असेल, तर हा केवळ ट्रस्ट किंवा प्रशासनाचा प्रश्न राहत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होतो.

सर्वोच्च न्यायालयाने योग्यच म्हटले आहे की, या विषयाचे राजकारण होऊ नये. परंतु त्याचवेळी पूर्ण सत्य जनतेसमोर येणे, दोषींना कठोर शिक्षा होणे, देणगी व्यवस्थापनात पारदर्शक सुधारणा करणे आणि भविष्यात अशी घटना पुन्हा घडणार नाही याची खात्री देणे, ही देखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. कारण श्रद्धेवर उभारलेल्या मंदिराचे खरे संरक्षण दगड-विटांचे नसते, तर भाविकांच्या विश्वासाचे असते.

आज देशातील सामान्य रामभक्तांना कोणत्याही राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा एकच उत्तर हवे आहेरामाच्या नावाने अर्पण केलेल्या प्रत्येक रुपयाचा हिशेब पारदर्शकपणे दिला जाईल का? आणि जर कोणी श्रद्धेचा गैरवापर केला असेल, तर त्याला कायद्यापुढे खरोखरच कठोर शिक्षा होईल का? या प्रश्नांची स्पष्ट आणि विश्वासार्ह उत्तरे मिळाल्यानंतरच या प्रकरणात न्याय झाला, असे कोट्यवधी भाविकांना वाटू शकेल.

# आंदोलनावर कॅमेऱ्यांचे पहारे लोकशाहीतील विरोधाचा अधिकार धोक्यात?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशाच्या लोकशाही व्यवस्थेत शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार मानला जातो. मात्र, दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या कॉकरोच जनता पक्षाच्या (सीजेपी) आंदोलनादरम्यान आंदोलकांवर सतत छायाचित्रण, चित्रीकरण आणि देखरेख ठेवली जात असल्याच्या आरोपांमुळे आंदोलनाचा अधिकार आणि नागरिकांच्या गोपनीयतेबाबत नवा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणावर २० जुलै २०२६ रोजी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली.

दिल्ली पोलिसांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठासमोर सांगितले की, जंतर-मंतरवरील छायाचित्रण आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग हे केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केले जाते. हे कोणत्याही प्रकारचे पाळत ठेवणे किंवा हेरगिरी नाही. जंतर-मंतरवर जवळपास दररोज आंदोलने होतात आणि प्रत्येक आंदोलनाचे चित्रीकरण केले जाते. आंदोलक स्वतःही शेकडो व्हिडिओ आणि रील्स तयार करून समाजमाध्यमांवर प्रसारित करतात, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यांनी ही जनहित याचिका अनावश्यक न्यायालयीन याचिका असल्याचेही म्हटले.

ही जनहित याचिका माजी जेएनयू विद्यार्थी संघाच्या अध्यक्षा आयशी घोष यांनी दाखल केली



आहे. याचिकेनुसार, २० जून २०२६ पासून सुरू असलेल्या सीजेपीच्या धरणे आणि उपोषणादरम्यान आंदोलनस्थळी कायमस्वरूपी देखरेख मनोरा उभारण्यात आला असून आंदोलकांवर चोवीस तास नजर ठेवली जात आहे. केवळ आंदोलन नव्हे, तर जेवणे, विश्रांती घेणे, वैद्यकीय मदत घेणे अशा दैनंदिन कृतींचेही चित्रीकरण होत असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

याचिकेत आणखी गंभीर आरोप करण्यात आले आहेत. आंदोलनात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या छायाचित्रे आणि व्हिडिओ त्यांच्या पालकांना तसेच शैक्षणिक संस्थांना पाठविण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेक जण आंदोलनात सहभागी होण्यास कचरू लागल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. महिलांच्या बाबतीतही मुसळधार पावसात ओल्या कपड्यांमध्ये असतानाही त्यांचे चित्रीकरण सुरू ठेवण्यात आल्याने त्यांच्या सन्मान आणि गोपनीयतेचा भंग झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सुनावणीदरम्यान दिल्ली उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या 'मजदूर किसान शक्ती संघटन विरुद्ध भारत सरकार' या निर्णयाचा उल्लेख करत आंदोलने आणि उपोषणांसाठी कोणती प्रमाणित कार्यपद्धती अस्तित्वात आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ जुलै २०२६ रोजी होणार आहे.

या प्रकरणामुळे एक व्यापक घटनात्मक प्रश्न समोर आला आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली राज्य यंत्रणा शांततापूर्ण आंदोलकांवर कितपत देखरेख ठेवू शकते? विशेषतः विद्यार्थी आणि तरुण नागरिक आंदोलनात सहभागी झाल्यास त्यांचे छायाचित्रण करून त्याचा दबावासाठी वापर होत असेल, तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार यावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी चिंता याचिकेत व्यक्त करण्यात आली आहे.

# 'ही संसद त्यांचीच आहे, कोणाच्या बापाची जहागिरी नाही''; प्रियंका गांधी तरुणांवरील लाठीहल्ल्यानंतर संतापल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** ''तुम्ही त्यांच्याशी चर्चा करण्याऐवजी मुलांना मारत आहात, कशासाठी? ही संसद त्यांचीच आहे. कोणाच्या बापाची जहागिरी नाहीये'', अशा शब्दात काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी केंद्र सरकारवर संताप व्यक्त केला.

दिल्लीतकॉक्रोच जनता पार्टीने सोमवारी जंतर-मंतर ते संसद भवन मोर्चाची हाक दिली होती. देशभरातून तरुण दिल्लीत दाखल झाले होते. गर्दी वाढत गेल्यानंतर पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, गर्दी वाढत जाऊन तरुण आक्रमक झाले. त्यानंतर बळाचा वापर करण्यात आला. तरुणांवर लाठीहल्ला केल्याच्या प्रकारावर खासदार प्रियंका गांधी यांनी संताप व्यक्त केला.

प्रियंका गांधी काय म्हणाल्या?

''हा खूप मुर्खपणा आहे. आपलीच मुले आहेत. या देशाचे भविष्य आहे. ही संसद त्यांचीच आहे. कोणाच्या बापाची जहागिरी नाही. राहुल गांधी बऱ्याच काळापासून हा मुद्दा मांडत आहेत. तुम्ही तरुणांशी चर्चा करण्याऐवजी त्यांना मारहाण करत आहात, कशासाठी करत आहात?'', असा सवाल खासदार प्रियंका गांधी यांनी केला.

अमित शाह-धर्मेंद्र प्रधान यांच्यात बैठक संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशीचे कामकाज केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्या मागणीमुळे होऊ शकले नाही. आंदोलकांनी रस्त्यावर उतरत सरकारचे मागण्यांकडे लक्ष



वेधून घेतले, तर संसदेच्या दोन्ही सभागृहात विरोधकांनी सरकारला घेरले. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी भेट घेतली.

दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल साडेतीन तास बैठक झाली. संसद भवन परिसरात असलेल्या अमित शाह यांच्या कार्यालयात ही बैठक झाली असून, दोन्ही नेत्यांमध्ये कोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली, याबद्दल कोणतीही माहिती दिली गेली नाही. दरम्यान, पोलिसांकडून मोर्चा अडवण्यासाठी लाठीहल्ला आणि अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. आंदोलकांना पांगवण्याचे प्रयत्न दिल्ली पोलीस आणि सुरक्षाकांकडून करण्यात आले.

या वेळी आंदोलक आणि पोलीस यांच्यात जोरदार झटापटी ठिकठिकाणी बघायला मिळाल्या. असंख्य आंदोलक आणि पोलीस यात जखमी झाले आहेत. काहींवर रुग्णालयात दाखल केले गेले. दरम्यान, आम्ही माघार घेणार नाही, असेही सीजेपीने जाहीर केले.

# पहिल्याच दिवशी संसद ठप्प, सरकार मात्र शांत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी, २० जुलै २०२६, लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांचे कामकाज वारंवार तहकूब करावे लागले. विरोधी पक्षांनी देशभरात चर्चेत असलेल्या स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका गळती, दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलन, तसेच इतर सार्वजनिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर तातडीने चर्चा घेण्याची मागणी करत सरकारला घेरले. मात्र, या मागण्यांवर सरकारकडून तत्काळ सविस्तर उत्तर किंवा चर्चेसाठी स्पष्ट भूमिका समोर आली नाही, असा आरोप विरोधकांनी केला.

राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित करत म्हटले की, देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नपत्रिका गळतीचे प्रकार वारंवार समोर येत आहेत. त्यांनी आरोप केला की, सरकार या गंभीर विषयावर स्पष्ट भूमिका मांडण्याऐवजी चर्चाच टाळत आहे. खर्गे यांनी दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनाचा उल्लेख करत आंदोलकांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही केला. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार हा संविधानाने दिलेला अधिकार असून त्याबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली.

विरोधकांनी सभागृहात सातत्याने घोषणाबाजी करत या मुद्द्यांवर नियमांनुसार चर्चा घेण्याचा आग्रह धरला. गोंधळ वाढताच राज्यसभेचे सभापती व्ही. पी. राधाकृष्णन यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला आणि संसदीय कामकाज सुरळीत करण्यासाठी बिझनेस अॅडव्हायजरी कमिटी (BAC) ची बैठक बोलावली. तरीही वातावरण शांत न झाल्याने सभागृहाचे कामकाज वारंवार तहकूब करण्यात आले.

विरोधी पक्षांचा आरोप आहे की, देशभरात स्पर्धा परीक्षांमधील अनियमिततेमुळे लाखो विद्यार्थ्यांचा सरकारवरील



विश्वास डळमळीत झाला आहे. गेल्या काही वर्षांत विविध भरती परीक्षा आणि प्रवेश परीक्षांमधील कथित प्रश्नपत्रिका गळतीच्या घटनांमुळे युवकांमध्ये संताप वाढत आहे. अशा परिस्थितीत सरकारने केवळ चौकशीच्या घोषणा न करता ठोस उत्तरदायित्व निश्चित करावे, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करावी, अशी विरोधकांची मागणी आहे.

जंतर-मंतरवरील आंदोलनाच्या संदर्भातही विरोधकांनी सरकारवर टीका केली. आंदोलकांच्या मागण्यांवर चर्चा करण्याऐवजी आंदोलनांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करण्यात आला. विरोधी सदस्यांनी संसद ही जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठीची सर्वोच्च संस्था असल्याचे सांगत या विषयांवर तातडीने चर्चा घेण्याची मागणी केली.

दरम्यान, सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी विरोधकांवर सभागृहाचे कामकाज जाणीवपूर्वक ठप्प करण्याचा आरोप केला. सरकारच्या बाजूने काही मंत्र्यांनी कामकाज सुरू देण्याचे आवाहन केले, मात्र प्रश्नपत्रिका गळती आणि आंदोलनांच्या मुद्द्यांवर विस्तृत निवेदन तातडीने सभागृहात करण्यात आले नाही.

संसदेच्या पहिल्याच दिवशी निर्माण झालेल्या या कोंडीमुळे आगामी अधिवेशनात सरकार आणि विरोधक यांच्यातील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. रोजगार, परीक्षा प्रणालीची विश्वासार्हता, आंदोलकांचे प्रश्न आणि प्रशासनाची उत्तरदायित्व यांसारखे मुद्दे पुढील काही दिवस संसदेच्या केंद्रस्थानी राहण्याची शक्यता आहे.

## संपादकीय

### इस्रोतील शास्त्रज्ञांचे राजीनामे : विज्ञानासाठी इशारा की बदलत्या रोजगार बाजाराचे वास्तव?

भारताने गेल्या काही वर्षांत अंतराळ संशोधनात अभूतपूर्व यश मिळवले आहे. चांद्रयान-३, आदित्य-एल१, गगनयानची तयारी आणि आगामी महत्त्वाकांक्षी मोहिमांमुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) जगभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशामुळे प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटतो. मात्र, याच काळात इस्रोतील अनेक शास्त्रज्ञांनी राजीनामे दिल्याच्या वृत्तांमुळे एक गंभीर प्रश्न समोर आला आहे भारतातील सर्वोच्च वैज्ञानिक संस्थांमध्ये प्रतिभावान मनुष्यबळ टिकवून ठेवण्याचे आव्हान वाढत आहे का?

जर अनुभवी वैज्ञानिक मोठ्या प्रमाणात संस्था सोडत असतील, तर त्यामागील कारणांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. केवळ खासगी क्षेत्रातील अधिक वेतन, जागतिक रोजगाराच्या संधी किंवा करिअरमधील प्रगती हीच कारणे आहेत, की संस्थात्मक पातळीवरही काही सुधारणा आवश्यक आहेत, याचे उत्तर वस्तुनिष्ठपणे शोधले गेले पाहिजे.

अंतराळ क्षेत्रात खासगी उद्योग झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे सरकारी संशोधन संस्थांतील वैज्ञानिकांना अधिक आकर्षक संधी उपलब्ध होणे स्वाभाविक आहे. मात्र, याचा अर्थ असा नाही की राष्ट्रीय संशोधन संस्थांमधील अनुभवी मनुष्यबळ गमावणे ही सामान्य बाब मानली जावी. गगनयान, भारतीय अंतराळ स्थानक, चांद्रयान-४ आणि भविष्यातील मोहिमांसाठी अनुभवी वैज्ञानिकांचे योगदान अमूल्य आहे.

इतिहास पाहिला तर स्वातंत्र्योत्तर काळात मर्यादित संसाधने असूनही भारताने वैज्ञानिक संस्था उभारण्याला प्राधान्य दिले. डॉ. होमी भाभा, डॉ. विक्रम साराभाई यांसारख्या वैज्ञानिकांच्या नेतृत्वाखाली संशोधनाची भक्कम पायाभरणी झाली. त्या काळातील परिस्थिती आणि आजचा जागतिक रोजगार बाजार वेगळा असला, तरी संशोधन संस्थांना सक्षम मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आजही तितकीच महत्त्वाची आहे.

सरकारने अंतराळ क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली असून अनेक ऐतिहासिक मोहिमा यशस्वी झाल्या आहेत. या यशाचे श्रेय धोरणकर्ते, अभियंते, तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ या सर्वांनाच जाते. त्यामुळे या यशाचा पाया अधिक मजबूत करण्यासाठी वैज्ञानिकांना टिकवून ठेवणे, रिक्त पदे वेळेत भरणे, संशोधनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि स्पर्धात्मक करिअर वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर काही प्रश्न उपस्थित होतात. राजीनाम्यांची नेमकी कारणे काय आहेत? रिक्त पदे कितपत भरली जात आहेत? अनुभवी वैज्ञानिक संस्थेत टिकून राहावेत यासाठी कोणती दीर्घकालीन धोरणे आखली जात आहेत? या प्रश्नांची उत्तरे मिळणे हे सरकार, इस्रो प्रशासन आणि नागरिक या सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

लोकशाहीत प्रश्न विचारणे म्हणजे संस्थांवर अविश्वास व्यक्त करणे नव्हे; उलट त्यांना अधिक सक्षम आणि उत्तरदायी बनवण्याचा प्रयत्न असतो. भारताची वैज्ञानिक ताकद केवळ यशस्वी रॉकेट प्रक्षेपणांत नाही, तर त्या यशामागे आयुष्य समर्पित करणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये आहे. म्हणूनच, वैज्ञानिक प्रतिभा जपणे आणि त्यांना सक्षम कार्यपरिसर उपलब्ध करून देणे ही भविष्यातील भारतासाठी सर्वात मोठी गुंतवणूक ठरणार आहे.

# बिजलीनगरमध्ये मटका, गावठी दारू व स्लॉट सेंटरवर पोलिसांचा मोठा छापा; शंकर मिसाळसह तिघांवर गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** चिंचवड पोलिसांनी बिजलीनगर परिसरात सुरू असलेल्या अवैध मटका, गावठी दारू अड्डे आणि स्लॉट सेंटरवर मोठी कारवाई करत मटका चालक शंकर मिसाळ याच्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे चित्र दिसून आले आहे.

स्थानिक नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले असले, तरी ही केवळ सुरुवात असून संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश व्हावा, अशी जोरदार मागणी केली आहे. या अवैध व्यवसायामागील आर्थिक साखळी, संबंधित सूत्रधार आणि लाभार्थी यांचा शोध घेऊन संपूर्ण जाळे उद्ध्वस्त करण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, परिसरात या आरोपींना काही स्थानिक राजकीय व्यक्तींचे संरक्षण असल्याची चर्चा सुरू असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. मात्र, या आरोपांना अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली नाही.

राजकीय हस्तक्षेप किंवा दबावाची शक्यता लक्षात घेता, या प्रकरणाची निष्पक्ष, स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी करण्यात यावी, तसेच कोणत्याही दबावाला बळी न पडता संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

याशिवाय, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या सामाजिक सुरक्षा पथकाने बिजलीनगर परिसरात विशेष आणि सातत्यपूर्ण मोहीम राबवून मटका, गावठी दारू आणि स्लॉट सेंटरसारख्या अवैध धंद्यांचे कायमस्वरूपी उच्चाटन करावे, अशीही नागरिकांची मागणी आहे.

# मोशी कचरा प्रश्न पुन्हा पेटला; 'भोसरीबाहेरील कचरा नको', नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांचा एल्गार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, मोशी परिसरातील लोकप्रतिनिधींनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मोशी कचरा डेपोवर केवळ भोसरी विधानसभा मतदारसंघातील कचरा टाकावा, पिंपरी व चिंचवड विधानसभा मतदारसंघातील कचरा येथे आणू नये, अशी ठाम मागणी भाजपचे नगरसेवक निखिल शिवाजी बोऱ्हाडे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिलेल्या निवेदनात बोऱ्हाडे यांनी नमूद केले की, ८ जुलै २०२६ रोजी मोशी कचरा डेपोवरील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पावर कचऱ्याचा डोंगर कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतरही वाढत्या शहराचा कचरा मोशीवरच टाकण्याचा प्रयत्न सुरू असल्याने स्थानिकांमध्ये तीव्र संताप आहे.

**'४० वर्षांचा भार आता पुरे'**

निवेदनानुसार, १९८२ पासून शहरातील कचऱ्याची विल्हेवाट मोशी येथे लावली जात आहे. शहराची लोकसंख्या सुमारे ४० लाखांवर पोहोचली असून, दररोज सुमारे १,५०० मेट्रिक टन कचरा निर्माण होतो. त्यातील मोठा हिस्सा मोशी डेपोवर टाकला जात असल्याने परिसरातील नागरिकांना आरोग्य, पर्यावरण आणि सुरक्षिततेच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे. मोशी परिसरातील नागरिकांनी अनेक दशकांपासून शहराचा कचरा सहन केला असून, आता इतर मतदारसंघांचा कचरा मोशीत आणण्याचा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, असा इशाराही बोऱ्हाडे यांनी दिला आहे.

**स्वतंत्र कचरा प्रकल्पांची मागणी**

पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघांसाठी स्वतंत्र व शाश्वत कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारावेत, अशी मागणी करत प्रशासनाने अन्य मतदारसंघांचा कचरा मोशी येथे टाकण्याचा निर्णय घेतल्यास स्थानिक नागरिक, ग्रामस्थ आणि सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींसह तीव्र लोकशाही आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. प्रसंगी कचरा डेपोच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

**मोशीकरांच्या सहनशीलतेचा अंत झाला**

यावेळी नगरसेवक निखिल बोऱ्हाडे म्हणाले, मोशी कचरा डेपो भोसरी मतदारसंघात असून येथील नागरिकांनी अनेक वर्षे शहराचा कचरा सहन केला आहे. आता पिंपरी आणि चिंचवडसाठी स्वतंत्र कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणे ही महापालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. मोशीकरांच्या आरोग्याशी, पर्यावरणाशी आणि सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही. प्रशासनाने आमच्या मागण्यांची दखल घेतली नाही,

तर न्याय मिळेपर्यंत तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू राहील.

मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा मुद्दा अधिकच संवेदनशील बनला असून, प्रशासन या मागण्यांवर काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण पिंपरी-चिंचवडकरांचे लक्ष लागले आहे.

# मोशी दुर्घटनेनंतर ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्यांसाठी महापौर रवि लांडगे यांचा पाठपुरावा; आयुक्तांसमवेत बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प परिसरात घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्या आणि परिसरातील विविध प्रश्नांबाबत महापौर रवि लांडगे यांच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

बैठकीत मोशी ग्रामस्थांनी दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेत मृतांच्या कुटुंबीयांना न्याय, दोषींवर कठोर कारवाई, परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी, कचरा डेपोमुळे होणारे आरोग्य व पर्यावरणीय परिणाम तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक प्रश्नांबाबत सविस्तर मांडणी केली.

ग्रामस्थांनी ही घटना केवळ एका अपघातापुरती मर्यादित नसून नागरिकांच्या सुरक्षितता, पर्यावरण आणि प्रशासनावरील विश्वासाशी निगडित गंभीर बाब असल्याचे नमूद केले. मोशीकरांच्या न्याय्य मागण्यांवर कोणतीही तडजोड होऊ नये आणि प्रशासनाने या विषयाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. महापौर रवि लांडगे यांनी ग्रामस्थांच्या सर्व मागण्या आयुक्तांसमोर मांडत, दुर्घटनाग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि मोशीतील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी भूमिका व्यक्त केली.

बैठकीत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी ग्रामस्थांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करत संबंधित विषयांवर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, तसेच दुर्घटनाग्रस्तांना न्याय मिळावा, दोषींवर कायदेशीर कारवाई व्हावी आणि मोशी परिसरातील सुरक्षितता, आरोग्य व पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांवर आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.

या बैठकीमुळे मोशी दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या विविध प्रश्नांवर प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यात सकारात्मक संवाद घडून आला असून, पुढील कार्यवाहीकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या**

- दुर्घटनेस जबाबदार अधिकारी, संबंधित यंत्रणा आणि कंपनीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.
- मृतांच्या कुटुंबीयांना तातडीने भरीव आर्थिक मदत द्यावी.
- जखमी नागरिकांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासन व महापालिकेने उचलावा.
- पीडित कुटुंबातील एका पात्र सदस्याला शासकीय किंवा महापालिका सेवेत नोकरी देण्यासाठी कार्यवाही करावी.
- मोशी कचरा डेपोबाबत कायमस्वरूपी निर्णय घेऊन परिसरातील नागरिकांना दिलासा द्यावा.
- आरोग्य, पर्यावरण आणि सुरक्षिततेशी संबंधित प्रश्नांवर दीर्घकालीन उपाययोजना राबवाव्यात.
- ग्रामस्थांनी मांडलेले प्रलंबित नागरी सुविधा विषयक प्रश्न प्राधान्याने सोडवावेत.

# चिंचवडेनगरमधील ई-स्कूटर आगीच्या घटनेने सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** चिंचवडेनगर येथील एका निवासी इमारतीच्या पार्किंगमध्ये चार्जिंगला लावलेल्या इलेक्ट्रिक दुचाकींना आग लागल्याच्या घटनेने इलेक्ट्रिक वाहनांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे. या आगीत तीन इलेक्ट्रिक दुचाकी जळून खाक झाल्या, तर आगीची झळ लागून दोन मजली इमारतीचे नुकसान झाले. या दुर्घटनेत एक व्यक्ती गंभीर जखमी झाली असून, अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठी जीवितहानी टळली.

देशभरात पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वेगाने वाढत आहे. इंधनावरील खर्चात बचत, प्रदूषणात घट आणि विविध शासकीय प्रोत्साहन योजनांमुळे नागरिकांचा कल ई-वाहनांकडे वाढत आहे. मात्र या वाढत्या वापरासोबत सुरक्षित चार्जिंग व्यवस्था, दर्जेदार बॅटरी आणि योग्य देखभाल यांचे महत्त्वही अधोरेखित होत आहे.

गेल्या काही वर्षांत देशातील विविध शहरांमध्ये इलेक्ट्रिक दुचाकींना आग लागल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये चार्जिंगदरम्यान आग लागली, तर काही वाहन चालू असताना बॅटरीमध्ये बिघाड झाल्याचे समोर आले. तज्ज्ञांच्या मते, निकृष्ट दर्जाच्या बॅटऱ्या, बॅटरी मॅनेजमेंट सिस्टिम (इचड) मधील त्रुटी, अयोग्य चार्जरचा वापर, अतिउष्ण तापमान, अनधिकृत मॉडिफिकेशन किंवा देखभालीतील निष्काळजीपणा ही अशा घटनांमागील संभाव्य कारणे असू शकतात. त्यामुळे प्रत्येक घटनेचे कारण स्वतंत्र तपासानंतरच स्पष्ट होऊ शकते.

निवासी इमारतींमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचे चार्जिंग करताना आवश्यक सुरक्षेच्या उपाययोजना पाळल्या जात नसल्याचेही अनेकदा दिसून येते. अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये स्वतंत्र ई-व्हेईकल चार्जिंग सुविधा उपलब्ध नसल्याने सामान्य वीजजोडणीवरच चार्जिंग केले जाते. काही ठिकाणी जुने वायरिंग, निकृष्ट दर्जाचे एक्स्टेन्शन बोर्ड किंवा कंपनीने सुचविलेल्या चार्जरऐवजी इतर चार्जर वापरले जातात. अशा प्रकारची निष्काळजीपणा मोठ्या दुर्घटनेस कारणीभूत ठरू शकतो.

दरम्यान, चिंचवडेनगर येथील आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू असून, प्राथमिक निष्कर्ष येईपर्यंत कोणतेही ठोस कारण सांगणे शक्य नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रिक वाहनांच्या सुरक्षित वापराबाबत नागरिकांनी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# 'तुला हॉटेल चालवायचे असेल तर महिना १० हजार द्यावे लागतील'; हॉटेल चालकाला मारहाण करत खंडणीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**काळेवाडी :** हॉटेलमधून पार्सल घेतलेल्या तंदूरचे पैसे मागितल्याचा राग मनात धरून दोन सराईत गुंडांनी हॉटेल चालकाला आणि मॅनेजरला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना काळेवाडीतील नढेनगर येथे घडली आहे.

आरोपी अटक: प्रतीक उर्फ बबऱ्या गोरख भराटे (वय २३, रा. मिलिट्री कॅम्प, दिघी) आणि रोहित मानसिंग राठोड (वय २०, रा. नढेनगर, काळेवाडी) या दोन्ही आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे.

नेमकी घटना: आरोपींनी महेश नढे यांच्या हॉटेलमधून तंदूरचे पार्सल घेतले होते. मॅनेजरने पैशांची मागणी केली असता, आरोपींनी ''आम्ही नुकतेच जेलमधून सुटून आलोय, आम्हाला ओळखत नाही का?'' असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच, ''हॉटेल चालवायचे असेल तर महिन्याला १०,००० रुपये हप्ता द्यावा लागेल, नाहीतर हॉटेल चालू देणार नाही,'' अशी धमकी दिली. नकार दिला असता आरोपींनी सिमेंटच्या गट्टूने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या पंजावर मारून गंभीर जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ११४(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५), ११८(१), ३०८(२), ३०८(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**चिखली आणि चाकण परिसरात पोलिसांची दारू अड्ड्यांवर धाड; हजारो रुपयांचा ऐवज जप्त**

पोलीस आयुक्तालय हद्दीत बेकायदेशीर गावठी व देशी दारूची विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी कडक कारवाई केली आहे.

चिखली (गुन्हा क्र. १): देहू-आळंदी रोडवरील 'हॉटेल सहारा' समोरून आरोपी नरेश दाहू दास (वय ३५ वर्ष, मूळ रा. दरभंगा, बिहार) याला चिखली पोलिसांनी अटक केली. त्याच्या ताब्यातून ५,११०/- रुपये किमतीच्या एकूण ४५ देशी दारूच्या बाटल्या आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

चाकण (गुन्हा क्र. २): मौजे संतोषनगर ते ठाकूर पिंपरी जाणाऱ्या रोडवरील 'हॉटेल जय मल्हार'च्या कडेला बेकायदेशीरपणे देशी दारू विकणाऱ्या दीपक संपत शिंदे (वय २२ वर्ष, रा. निमगाव खंडोबा, ता. खेड) या तरुणावर गुन्हे शाखा युनिट-३ चे पोलीस प्रदिप अस्लम राळे यांनी कारवाई केली. आरोपीकडून ३,२००/- रुपये किमतीच्या 'पावर लाईम' कंपनीच्या देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलीस आवाहन: पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या आमिषाला बळी पडून स्वतःचे बँक खाते सायबर गुन्हेगारांना वापरू देऊ नका. तसेच परिसरात काही संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.

# महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्व अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान करावे : पांडुरंग आवारे-पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सांगवी :** दि.२० जुलै रोजी महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्व अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त व सांगवी आणि पिंपरी-चिंचवड शहराचे विकासाचे शिल्पकार पिं-चिं महानगर पालिकेचे मा महापौर स्व अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे यांच्या बाराव्या पुण्यस्मरणार्थ दि.१९/०७/२०२६ रोजी लिटल फ्लॉवर स्कूल, शितोळेनगर सांगवी, पुणे.येथे भव्य रक्तदान शिबीर पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेचे मा स्थाई समिती सभापती अतुल नानासाहेब शितोळे व शितोळेनगर क्रीडा मित्र मंडळ व मित्र परीवार यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते या रक्तदान शिबिरात राष्ट्रवादीकाँग्रेस पार्टीचे युवा नेते पांडुरंग




आवारे-पाटील यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले व रक्तदान हेच श्रेष्ठ दान ह्या भावनेने राज्याचे लोकनेते स्व.अजित दादा पवार यांना श्रद्धांजली म्हणून राज्यातील ज्यांना शक्य असेल त्या सर्वांनी रक्तदान करावे अशे अव्हाण पांडुरंग आवारेंनी केले व स्व अजित दादा पवार व स्व नानासाहेब शितोळे यांच्या प्रथमेचे दर्शन घेऊन विनम्र अभिवादन केले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### गवार तोडणीला वेग; भावातील चढ-उतारामुळे शेतकरी चिंतेत



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील धामणी, वाळूंजनगर, लाखणगाव, पोंदेवाडी, जारकरवाडी आणि बढेकरमळा परिसरात गवार तोडणीला वेग आला आहे. यंदा गवाराचे उत्पादन समाधानकारक असले तरी बाजारभावातील सातत्याने होणाऱ्या चढ-उतारामुळे गवार उत्पादक शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

या परिसरात यंदा मोठ्या प्रमाणावर गवारची लागवड करण्यात आली आहे. लागवडीनंतर साधारण ४० ते ४५ दिवसांनी गवार तोडणीस येते. एका पिकातून सहा ते सात वेळा तोडणी करता येत असल्याने चांगला बाजारभाव मिळाल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळण्याची अपेक्षा असते. सध्या दहा किलो गवारला सुमारे ५०० ते ५५० रुपये बाजारभाव मिळत असला तरी दरातील अस्थिरतेमुळे शेतकरी संभ्रमात आहेत.

यंदा पावसाने उशिरा का होईना समाधानकारक हजेरी लावल्याने गवारसह इतर भाजीपाला पिकांनाही मोठा फायदा झाला आहे. परिसरातील ओढे-नाले पाण्याने भरून वाहत असल्याने पाण्याची कमतरता भासणार नसल्याचा विश्वास शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे अनेकांनी भाजीपाला लागवडीकडे मोर्चा वळविला आहे.

दरम्यान, सध्या शेतीच्या कामांना वेग आल्याने मजुरांची मोठी टंचाई जाणवत आहे.

त्यामुळे तोडणीसह इतर कामांसाठी शेतकऱ्यांची धावपळ वाढली आहे. भाजीपाल्याला योग्य बाजारभाव मिळाला नाही, तर उत्पादन खर्चही वसूल होणे कठीण होईल, अशी चिंता सुरेश बढेकर, संजय बबन बढेकर, अशोक बढेकर, प्रविण बढेकर, शाम बढेकर, अशोक जाधव यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# सोलापूर जिल्ह्यात श्री संत तुकाराम महाराज पालखीचे भक्तिमय स्वागत; अकलूजच्या रिंगण सोहळ्याने भाविक मंत्रमुग्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पंढरपूर :** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे सोलापूर जिल्ह्यातील सराटी-अकलूज येथे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. यावेळी पादुका पूजन, अश्व पूजन, पुष्पवृष्टी आणि नामस्मरणाने परिसर भक्तिमय झाला.

नीरा नदीचा पूल ओलांडून पालखी रथ सोलापूर जिल्ह्यात दाखल होताच जिल्हा प्रशासनाच्या वतीने जेसीबीच्या माध्यमातून पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी श्री संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेऊन पुष्पहार अर्पण केला. यापूर्वी पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने उपजिल्हाधिकारी उत्तम दिघे यांनी पालखी सोहळ्याची सूत्रे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांच्याकडे सुपूर्द केली. तसेच पुणे जिल्ह्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी संबंधित जबाबदाऱ्या सोलापूर जिल्हा प्रशासनाकडे सोपवल्या.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुणे पोलिस अधीक्षक संदीप सिंग गील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, पंचायत समिती सभापती मदनसिंह मोहिते पाटील, उपजिल्हाधिकारी विजया पांगारकर, अमित माळी, सुमित शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वागतस्थळी संध्याताई तिवाडी व त्यांच्या पथकाने भारूड सादर केले. विठ्ठल नामाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

**जिल्हाधिकाऱ्यांनी केले पालखी रथाचे सारथ्य**

पालखी स्वागतानंतर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी रथाचे सारथ्यही केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन आणि पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी उपस्थित होते.

**वारकऱ्यांसाठी प्रशासनाकडून विविध सुविधा**

पालखी सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, निवारा केंद्रे, आरोग्य उपचार केंद्र, 'हिरकणी' कक्ष, मुख्यमंत्री आरोग्य रथ तसेच आरोग्य बाईकची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. जिल्हा प्रशासनाने या सर्व सुविधांची पाहणी करून पालखी सोहळा प्रमुखांना माहिती दिली.

**अकलूजच्या रिंगण सोहळ्याने वेधले लक्ष**

अकलूज येथील सदाशिव माने विद्यालयाच्या मैदानावर पारंपरिक रिंगण सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. अश्वांच्या रिंगणाचे दर्शन घेण्यासाठी हजारो वारकरी आणि भाविकांनी गर्दी केली होती. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि अखंड नामस्मरणात पार पडलेल्या या सोहळ्याने उपस्थित भाविकांना भक्तीचा अविस्मरणीय अनुभव दिला.

दरम्यान, या स्वागत सोहळ्याला मराठी चित्रपट व दूरचित्रवाहिनी क्षेत्रातील अभिनेते भाऊ कदम तसेच अभिनेत्री शिवानी परब आणि संजना काळे यांनीही उपस्थिती लावली.

## शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा! कृषी सहाय्यक आता थेट ग्रामपंचायत कार्यालयात; सेवा गावपातळीवर उपलब्ध होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नगर । प्रतिनिधी :**

शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या सेवा अधिक सुलभ आणि सहज उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. आता कृषी सहाय्यक, उपकृषी अधिकारी आणि मंडळ कृषी अधिकारी थेट ग्रामपंचायत कार्यालयात बसून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याबाबतचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत.

शासनाने २०१९ मध्ये कृषी सहाय्यकांना ग्रामपातळीवर स्वतंत्र कार्यालयीन जागा आणि आवश्यक फर्निचर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आता या निर्णयाच्या अंमलबजावणीला गती देण्यात आली आहे.

नगर जिल्ह्यातील ४९ मंडळ कृषी अधिकारी, ९८ उपकृषी अधिकारी आणि ५८८ कृषी सहाय्यकांना संबंधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात १५० ते २०० चौरस फूट जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

राज्यात सध्या सुमारे ११ हजार ५९९ कृषी सहाय्यक कार्यरत आहेत. नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे, पीक पाहणी, कीड-रोग नियंत्रण, खत व्यवस्थापन, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार आणि विविध शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर असते.

या निर्णयामुळे शेतकऱ्यांना कृषी सहाय्यकांचा शोध घेत कार्यालयांमध्ये फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. ग्रामपंचायत कार्यालयातच त्यांना मार्गदर्शन, कागदपत्रांची पूर्तता आणि विविध योजनांबाबत माहिती उपलब्ध होणार आहे. ग्रामपंचायत कार्यालयात जागा उपलब्ध झाल्यानंतर तेथे टेबल, खुर्ची आणि कपाट यांसारख्या आवश्यक फर्निचरची व्यवस्था कृषी आयुक्तालयामार्फत करण्यात येणार आहे. नगर जिल्ह्यात काही मोठ्या ग्रामपंचायतींनी यापूर्वीच कृषी विभागाला जागा उपलब्ध करून दिली असली, तरी अनेक गावांमध्ये अद्याप कार्यालयाची सुविधा उपलब्ध नव्हती. या नव्या निर्णयामुळे त्या उणिवा दूर होण्यास मदत होणार आहे.

याशिवाय, प्रत्येक कार्यालयाबाहेर कृषी सहाय्यकाचे नाव, मोबाईल क्रमांक, कार्यालयीन वेळ आणि कामाचे दिवस नमूद असलेला फलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधणे अधिक सोपे होणार आहे.

## जुन्नर पोलिसांची मोठी कारवाई; इनोव्हा कारमधून 3 किलो गांजा जप्त, एकाला अटक, दोघे फरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**जुन्नर :** जुन्नर शहरातील अहिल्यादेवी होळकर शाळेच्या मैदानावर रात्री गस्तीदरम्यान संशयास्पद हालचाल आढळून आल्याने जुन्नर पोलिसांनी मोठी कारवाई करत सुमारे ३ किलो गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, दोघेजण फरार झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे सुमारे १.४५ वाजण्याच्या सुमारास हवालदार हांडे, डायल ११२ पथकातील पोलीस वाघमोडे आणि चालक सातपुते हे रात्रगस्त घालत असताना नगरपालिकेच्या अहिल्यादेवी होळकर शाळेच्या मैदानावर एक इनोव्हा कार आणि एक दुचाकी संशयास्पद अवस्थेत उभी असल्याचे दिसले. पोलिसांनी चौकशीसाठी धाव घेताच तिघेजण पळून जाऊ लागले. त्यापैकी मयूर संजय खराडे ऊर्फ सनी (वय २७, रा. कल्याण पेठ, जुन्नर) याला पकडण्यात पोलिसांना यश आले.

चौकशीत आरोपीने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी टोयोटा इनोव्हा (MH-12 ET-3911) आणि ॲक्टिव्हा (MH-14 CH-6265) या वाहनांची झडती घेतली. त्यावेळी इनोव्हा कारमध्ये चिकट टेपने गुंडाळलेले एक पाकीट आणि ॲक्टिव्हाच्या हँडलला लटकविलेल्या प्लास्टिकच्या पिशवीत गांजासदृश पदार्थ आढळून आला.

पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या उपस्थितीत पंचनामा करून फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने जप्त पदार्थाचे वजन करण्यात आले. त्यामध्ये २.०६६ किलो आणि ०.९६२ किलो, असे एकूण सुमारे ३.०२८ किलो गांजा आढळून आला.

या प्रकरणात असीम खलील कुरेशी (रा. शुक्रवार पेठ, जुन्नर) आणि निखिल परदेशी (पूर्ण नाव व पत्ता अपूर्ण) हे दोघे आरोपी फरार असून, त्यांचा शोध सुरू आहे.

या तिघांनी संगनमत करून विक्रीच्या उद्देशाने अमली पदार्थ जवळ बाळगल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध एनडीपीएस (NDPS) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जगद्गुरू श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे नीरास्नान; सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथकाची दक्षता, हजारो वारकऱ्यांचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अकलूज :** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या जगद्गुरू श्री तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात पारंपरिक नीरास्नान विधी भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी हजारो वारकरी आणि भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून नीरास्नान सोहळ्याचे दर्शन घेतले.

नीरा नदी परिसरात भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन सोलापूर जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले होते. विशेषतः सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथक, पोलीस प्रशासन, महसूल विभाग, आरोग्य विभाग आणि अन्य संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी सतर्क राहून सुरक्षा व्यवस्था सांभाळली.

नदीपात्र आणि घाट परिसरात आपत्ती व्यवस्थापन पथकाने आवश्यक बचाव साहित्य, लाइफ जॅकेट, बचावनौका आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची व्यवस्था केली होती. भाविकांना सुरक्षितपणे दर्शन घेता यावे, यासाठी नदीकाठावर विशेष दक्षता घेण्यात आली.

टाळ-मृदंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या अखंड घोषात आणि भक्तिरसाने ओतप्रोत वातावरणात श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे नीरास्नान पार पडले. यावेळी वारकऱ्यांनी मोठ्या शिस्तीने आणि उत्साहात धार्मिक परंपरेत सहभाग नोंदविला.

## खडकवाडीत महावितरणच्या फ्यूज पेटीची दुरवस्था; दुर्घटनेची भीती, ग्रामस्थांचा संतप्त सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी गावठाणातील रस्त्यालगत असलेल्या महावितरणच्या रोहित्रावरील (डीपी) फ्यूज पेटीची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, संभाव्य अपघाताच्या भीतीने ग्रामस्थांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून फ्यूज पेटी उघडी पडलेली असून, फ्यूजऐवजी थेट ओपन वायर टाकून वीजपुरवठा सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सध्या पावसाळा आणि जोरदार वाऱ्याचा काळ असल्याने उघड्या तारा डीपीला स्पर्श झाल्यास संपूर्ण रोहित्रात विद्युतप्रवाह पसरून मोठी दुर्घटना घडू शकते. अशा दुर्घटनेची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित करण्यात आला आहे.

सदर डीपी गावठाणातील मुख्य रस्त्यालगत असल्याने येथून दररोज शाळकरी विद्यार्थी, महिला, नागरिक तसेच शेळ्या-मेंढ्या, जनावरे आणि भटकी कुत्री वावरत असतात. अशा परिस्थितीत कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी महावितरणने तातडीने फ्यूज पेटीची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे. याबाबत खडकवाडीचे माजी सरपंच अनिल डोके यांनी सांगितले की, या समस्येबाबत महावितरणकडे अनेकवेळा पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र, संबंधित विभागाकडून सातत्याने टाळाटाळ केली जात आहे. शेतकऱ्यांचे वीजबिल भरण्यास थोडा उशीर झाला तरी वीजपुरवठा खंडित करण्यासाठी तत्परता दाखवली जाते. मग जीवितास धोका निर्माण करणाऱ्या फ्यूज पेटीच्या दुरुस्तीसाठी हीच तत्परता का दिसत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**पूर्व भागातील अनेक गावांतही अशीच परिस्थिती**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांमध्ये महावितरणच्या रोहित्रांवरील फ्यूज पेट्यांची अवस्था अत्यंत खराब असून, अनेक ठिकाणी त्या उघड्या अवस्थेत असल्याची तक्रार ग्रामस्थांकडून केली जात आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी महावितरणने तातडीने सर्व फ्यूज पेट्यांची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बल्लाळवाडीत ४० दिवसीय मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ; महिलांच्या स्वावलंबनाला चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बल्लाळवाडी येथे ४० दिवसीय मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ आमदार शरददादा सोनवणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.

हा उपक्रम डिसेंट फाउंडेशन, पुणे आणि हायस्पीड स्किल हब, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून, बल्लाळेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, ग्रामविकास मंडळ, ग्रामपंचायत बल्लाळवाडी, बल्लाळेश्वर प्रतिष्ठान (मुंबई) तसेच गावातील महिला बचत गटांचे सहकार्य लाभले आहे. या ४० दिवसीय प्रशिक्षणात महिलांना आधुनिक शिवणकलेचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. विविध प्रकारचे ब्लाऊज, मुलींचे ड्रेस, परकर, लहान मुलांचे फ्रॉक, फॅन्सी झगे शिवण्याबरोबरच शिलाई मशीनची किरकोळ दुरुस्ती व देखभाल याबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांना प्रमाणपत्रासह उद्यम आधार कार्ड प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार शरददादा सोनवणे म्हणाले, ग्रामीण भागातील शेती व मजुरी करणाऱ्या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा उपक्रमांमुळे महिलांच्या सक्षमीकरणाला निश्चितच चालना मिळेल. कार्यक्रमाला डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, हायस्पीड स्किल हबचे प्रमुख दिलीप भगत, प्रशिक्षिका छाया पाटील व उज्वला गवळी, जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. एकनाथ डोंगरे, सरपंच संजय नायकोडी, विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष सुधीर डोंगरे यांच्यासह ग्रामस्थ, महिला बचत गटांच्या पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. ग्रामीण महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन स्वावलंबनाकडे वाटचाल घडवून आणण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे.

## भीमाशंकर कारखान्याकडून खोडवा अनुदानाचा दिलासा; १.०८ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

दत्तात्रयनगर, पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२५-२६ मधील खोडवा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. कारखान्याने प्रति मेट्रिक टन १०० रुपये या दराने १ कोटी ८ लाख ४० हजार रुपयांचे अनुदान थेट संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केले आहे.

महाराष्ट्राचे माजी सहकारमंत्री तथा कारखान्याचे संस्थापक-संचालक आ. दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार १ लाख ८ हजार ७०२ मेट्रिक टन खोडवा उसासाठी हे अनुदान वितरित करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी दिली.




कारखान्याने यापूर्वी गाळप केलेल्या उसाची एफआरपीनुसार प्रति मेट्रिक टन ३,२७३ रुपये इतकी रक्कम वेळेत अदा केली होती. त्यानंतर दिलेल्या आश्वासनानुसार खोडवा उसासाठीचे अतिरिक्त अनुदानही थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे ऊस लागवड, मशागत आणि वाढत्या उत्पादन खर्चाचा भार कमी होण्यास मदत होणार असून, ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कारखाना प्रशासनाने सांगितले की, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने आजपर्यंत सभासद, बिगर सभासद आणि गेटकेन ऊस उत्पादकांमध्ये कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान दर देण्याची परंपरा कायम राखली आहे.

दरम्यान, आगामी २०२६-२७ गाळप हंगामासाठी कार्यक्षेत्रातील तसेच परिसरातील सर्व ऊस उत्पादकांनी आपला ऊस भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याकडेच पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी केले आहे.

## सारांश वृत्त

### “१५२ पेपर फुटले, ७ कोटी विद्यार्थ्यांना त्रास झाला आणि शिक्षा...“; राहुल गांधींची टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नीट परीक्षेत झालेल्या गोंधळाची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉक्रोच जनता पार्टीने आज दिल्लीमध्ये संसद चलो आंदोलन केले. या आंदोलनामध्ये विद्यार्थ्यांसह हजारो नागरिकही सहभागी झाले होते. यादरम्यान, आंदोलन करत असलेल्या उगझच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेऊन आपल्या तीन मागण्या त्यांच्यासमोर ठेवल्या. यानंतर कॉक्रोज जनता पार्टीच्या आंदोलकांनी आपले आंदोलन आता मागे घ्यावे, असे आवाहन नड्डा यांनी केले. या साऱ्या घटनाक्रमानंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर टीका केली.

राहुल गांधी यांनी आपल्या एक्स पोस्टमधून सरकारविरोधात अतिशय आक्रमक शब्दात आपली नाराजी व्यक्ती केली. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा सक्तीने घेऊ शकत नसलेल्या यंत्रणेवर त्यांनी टीका केली. १५२ प्रश्नपत्रिका फुटल्या, ७ कोटी विद्यार्थ्यांना याचा त्रास झाला आणि शिक्षा एकाही गुन्हेगाराला शिक्षा झालेली नाही. उलट शिक्षा कष्टकरी तरुणांना झाली, असे राहुल यांनी लिहिले. आंदोलकांवर पोलिसांकडून झालेला लाठीचार्ज आणि अटकेची कारवाई यासंदर्भातही त्यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. वाचा राहुल गांधी नेमके काय म्हणाले...

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आक्रमक भूमिका घेणाऱ्या कॉक्रोज जनता पार्टीने जे. नड्डा यांची भेट घेतली. यावेळी कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलकांनी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांची त्वरित सुटका करण्यात यावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात यावा, तसेच नीट परीक्षा रद्द झाल्याने जीवन संपवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, अशा मागण्या केल्या. तसेच धर्मेंद्र प्रधान हे राजीनामा देईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा दिला.

# ब्रिटनला दशकातील सातवे पंतप्रधान; अँडी बर्नहॅम सत्तेत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लंडन :** ब्रिटनच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा सत्ताबदल झाला असून २० जुलै २०२६ रोजी अँडी बर्नहॅम यांनी युनायटेड किंग्डमचे (यूके) पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला. विशेष म्हणजे, अवघ्या दहा वर्षांत ब्रिटनला सातवे पंतप्रधान मिळाले आहेत. सततच्या नेतृत्वबदलामुळे ब्रिटनच्या राजकीय स्थैर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून त्याचा परिणाम भारतासह अनेक देशांशी असलेल्या द्विपक्षीय संबंधांवर होऊ शकतो.



माजी मँचेस्टर महापौर असलेल्या बर्नहॅम यांनी १० डाउनिंग स्ट्रीट येथून राष्ट्राला संबोधित करत हा क्षण देशासाठी टर्निंग पॉइंट असल्याचे म्हटले. लंडनकेंद्रित सत्तेचे विकेंद्रीकरण करून देशातील विविध प्रदेशांना अधिक अधिकार आणि संसाधने देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सामाजिक विषमता कमी करणे आणि नव्या राजकीय मॉडेलची उभारणी करणे हे आपल्या सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दुसरीकडे, मावळते पंतप्रधान कीअर स्टार्मर यांनी पद सोडताना, मी हसतमुखाने आणि सन्मानाने जात आहे, असे म्हटले. केवळ दोन वर्षांपूर्वी लेबर पक्षाला ऐतिहासिक विजय मिळवून देणारे स्टार्मर आता लेबर पक्षाचे सर्वात कमी काळ पदावर राहिलेले पंतप्रधान ठरले आहेत.

भारत आणि ब्रिटन यांच्यात मुक्त व्यापार करार (FTA), गुंतवणूक, संरक्षण सहकार्य, उच्च शिक्षण, तंत्रज्ञान आणि स्थलांतर धोरण यांसारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा सुरू आहे. अशा वेळी ब्रिटनमध्ये पुन्हा नेतृत्व बदलल्याने काही धोरणात्मक निर्णयांचा वेग कमी होण्याची किंवा प्राधान्यक्रम बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ब्रिटन हा भारताचा महत्त्वाचा व्यापार आणि गुंतवणूक भागीदार आहे. त्यामुळे तेथील सततचे राजकीय नेतृत्वबदल आणि अस्थिरता भारताच्या आर्थिक व धोरणात्मक हितांवरही परिणाम करू शकतात. आता अँडी बर्नहॅम यांचे सरकार भारताशी सुरू असलेल्या सहकार्याला गती देणार की नव्या प्राधान्यक्रमांमुळे त्यात बदल होणार, याकडे नवी दिल्लीसह आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष लागले आहे.

## पासपोर्ट-व्हिसा सेवांतील खासगीकरणाला सर्वोच्च न्यायालयाचा ब्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** परदेशातील भारतीयांना दिल्या जाणाऱ्या कॉन्सुलर, पासपोर्ट आणि व्हिसा (उझत) सेवांच्या खासगीकरणासंदर्भात केंद्र सरकारला मोठा धक्का बसला आहे. २० जुलै २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार देत, अबू धाबी (णअए), कुवेत, सिंगापूर आणि कॅनबेरा (ऑस्ट्रेलिया) येथील भारतीय दूतावासांसाठी काढलेल्या आउटसोर्सिंग निविदा रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवला.

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, सर्वोच्च न्यायालय दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करणार नाही. मात्र, नव्या निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत परराष्ट्र मंत्रालयाला (चएअ) आवश्यक असल्यास तात्पुरती पर्यायी व्यवस्था करून नागरिकांना सेवा देण्याचे स्वातंत्र्य आहे. यापूर्वी दिल्ली उच्च न्यायालयाने या चार भारतीय मिशन्समधील कॉन्सुलर, पासपोर्ट आणि व्हिसा सेवा खासगी संस्थांकडे सोपविण्यासाठी काढलेल्या निविदा रद्द केल्या होत्या. न्यायालयाने नव्याने पारदर्शक निविदा प्रक्रिया राबवून सर्वात कमी दर (ङ१ - ड्रेशींं इळववशअ) देणाऱ्या पात्र संस्थेला काम देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. या निर्णयामुळे परदेशात राहणाऱ्या भारतीय नागरिकांना पासपोर्ट नूतनीकरण, व्हिसा, ओसीआय, प्रमाणपत्रे आणि इतर कॉन्सुलर सेवांच्या व्यवस्थेबाबत काही काळ अनिश्चितता निर्माण होण्याची शक्यता आहे.

## बंडखोर खासदारांसाठी संसदेत स्वतंत्र बाक; सरकारवर पक्षपाताचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संसदेतील आसनव्यवस्थेवरून नवा राजकीय वाद निर्माण झाला आहे. तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी बंडखोर खासदारांना संसदेत दिलेल्या जागेवर तीव्र आक्षेप घेत केंद्र सरकारवर संसदीय परंपरांशी तडजोड केल्याचा आरोप केला. त्यांनी या आसनव्यवस्थेला देशद्रोही बाक अशी उपमा देत सरकारवर टीका केली.

महुआ मोईत्रा यांनी पत्रकारांशी बोलताना दावा केला की, २० खासदारांविरोधात अपात्रतेच्या याचिका प्रलंबित असतानाही त्यांना अधिकृत बैठकीत स्थान देण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानुसार, हे खासदार अद्याप सभापतींकडून औपचारिक मान्यता न मिळालेल्या एनसीपीआय नावाच्या गटाशी जोडले गेले आहेत. अशा परिस्थितीत त्यांना अधिकृत संसदीय प्रक्रियेत स्थान देणे हे संसदीय परंपरांच्या विरोधात असल्याचा आरोप त्यांनी केला.

महुआ मोईत्रा यांच्या म्हणण्यानुसार, या मुद्द्याच्या निषेधार्थ संयुक्त विरोधी पक्षाने सर्वपक्षीय बैठकीतून वॉकआउट केले. त्यांनी आरोप केला की, संसदेतील पारंपरिक आसनव्यवस्थेत बदल करून बंडखोर सदस्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून, यामुळे संसदीय प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणामुळे संसदीय नियम, सभापतींचे अधिकार आणि पक्षांतराशी संबंधित घटनात्मक प्रक्रियेवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. विरोधकांचे म्हणणे आहे की, अपात्रतेच्या याचिकांवर अंतिम निर्णय होण्यापूर्वी अशा सदस्यांना अधिकृत मान्यता दिल्यास चुकीचा संदेश जाऊ शकतो.

## ‘बेटी बचाओ’च्या घोषणा पण शाळेतच विद्यार्थिनींचा अपमान? राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची राजस्थान सरकारला नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सवाई माधोपूर (राजस्थान) :** महिलांच्या सन्मान आणि मुलींच्या सुरक्षिततेबाबत मोठमोठ्या घोषणा होत असतानाच राजस्थानातील एका सरकारी शाळेत विद्यार्थिनींना कथितरीत्या कपडे काढण्यास भाग पाडल्याच्या आरोपांमुळे संताप व्यक्त होत आहे. २० जुलै २०२६ रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने या घटनेची स्वतःहून दखल घेत राज्य सरकारला नोटीस बजावत सविस्तर अहवाल आणि आतापर्यंत झालेल्या कारवाईची माहिती मागवली आहे.

आयोगाने घेतलेली दखल सवाई माधोपूर जिल्ह्यातील लिवाली गावातील सरकारी शाळेतील घटनेशी संबंधित आहे. वृत्तानुसार, इयत्ता नववी आणि अकरावी मधील विद्यार्थिनींची एका विद्यार्थिनीचे १,००० हरवल्याच्या तक्रारीनंतर दोन शिक्षकांनी झडती घेतली. या झडतीदरम्यान विद्यार्थिनींना मारहाण करण्यात आली आणि कपडे काढण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोप आहे. मात्र, या संपूर्ण झडतीनंतरही हरवलेले पैसे सापडले नसल्याचे समोर आले आहे.

या घटनेमुळे शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सन्मान, सुरक्षितता आणि मानवी हक्कांबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. विद्यार्थिनींच्या सन्मानाचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांच्यावरच असे आरोप होणे अत्यंत चिंताजनक असल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने आपल्या नोटिशीत नमूद केले की, माध्यमांमधील वृत्ते खरी असतील तर हा प्रकार मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन दर्शवतो. आयोगाने राजस्थान सरकारला संपूर्ण घटनेचा तपशील, संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई आणि दोषींवर कोणती पावले उचलली याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या घटनेनंतर शालेय व्यवस्थेतील उत्तरदायित्व, विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण आणि शैक्षणिक संस्थांमधील देखरेख यावर पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. राज्य सरकारकडून या प्रकरणात कोणती ठोस कारवाई केली जाते आणि दोषींना जबाबदार धरले जाते का, याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# खेळाडू घडवण्यात अपयश की देखरेखीत त्रुटी? डोपिंगची ७८ प्रकरणे संसदेत उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये पदकांची संख्या वाढविण्याचा दावा करत असताना, दुसरीकडे डोपिंगच्या वाढत्या घटनांनी भारतीय क्रीडा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी २० जुलै २०२६ रोजी लोकसभेत दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, १५ जुलै २०२६ पर्यंत देशात ७८ खेळाडूंच्या नमुन्यांमध्ये प्रतिबंधित पदार्थ (Adverse Analytical Findings - AAFs) आढळले आहेत.

ही माहिती भाजप खासदार संबित पात्रा यांनी मागील तीन वर्षांतील डोपिंग प्रकरणांबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सरकारने संसदेत दिली. सरकारच्या आकडेवारीनुसार, उत्तर प्रदेश आणि पंजाब या राज्यांमध्ये प्रत्येकी १३ डोपिंग प्रकरणे नोंदली गेली असून ती देशातील सर्वाधिक आहेत. ही आकडेवारी भारतीय क्रीडा क्षेत्रातील डोपिंगविरोधी यंत्रणा, प्रशिक्षण पद्धती आणि खेळाडूंमध्ये असलेल्या जागरूकतेबाबत गंभीर चिंता व्यक्त करणारी मानली जात आहे.

डोपिंग म्हणजे खेळातील कामगिरी कृत्रिमरीत्या वाढविण्यासाठी प्रतिबंधित औषधे किंवा रसायनांचा वापर. अशा प्रकारांमुळे केवळ संबंधित खेळाडूंच्या कारकिर्दीवर परिणाम होत नाही, तर देशाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिमाही धोक्यात येते. भारताने अलीकडच्या काळात ऑलिम्पिक, आशियाई आणि राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असली तरी अशा घटनांमुळे त्या यशावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या आकडेवारीमुळे राष्ट्रीय डोपिंगविरोधी यंत्रणेची परिणामकारकता, खेळाडूंना दिले जाणारे मार्गदर्शन, प्रशिक्षकांची जबाबदारी आणि क्रीडा महासंघांच्या देखरेखीवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, केवळ डोपिंग चाचण्या वाढविणे पुरेसे नसून, खेळाडूंना प्रतिबंधित औषधांची माहिती, पोषणविषयक मार्गदर्शन आणि कठोर अंमलबजावणी यावरही तितकाच भर देणे आवश्यक आहे.

संसदेत मांडण्यात आलेल्या या आकडेवारीनंतर भारतीय क्रीडा व्यवस्थेला डोपिंगमुक्त करण्यासाठी केंद्र सरकार आणि संबंधित संस्थांकडून आणखी प्रभावी उपाययोजना केल्या जातात का, याकडे आता क्रीडाविश्वाचे लक्ष लागले आहे. .

## बालवारकऱ्यांच्या दिंडींनी लोणी-धामणी परिसर भक्तिमय; हरिनामाच्या गजरात विठ्ठलभक्तीचा उत्सव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लोणी-धामणी परिसरातील गावांमध्ये बालवारकऱ्यांच्या दिंडींमुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे. गळ्यात टाळ, हातात भगव्या पताका आणि मुखी जय जय रामकृष्ण हरी, ज्ञानेश्वर माऊली तुकारामचा अखंड गजर करत बालगोपाळांनी काढलेल्या दिंडींनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

राज्यातील विविध भागांतून लाखो वारकरी पायी पंढरपूरकडे विठ्ठल दर्शनासाठी मार्गस्थ होत असताना, लोणी-धामणी परिसरातील बालवाडी, अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्येही दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले. पंढरपूरला प्रत्यक्ष जाता आले नाही, तरी शाळेत दिंडी काढून विठ्ठलभक्तीचा आनंद अनुभवण्याचा संदेश या चिमुकल्यांनी दिला.

दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीसह संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि इतर संतांची वेशभूषा साकारत वारकरी परंपरेचे दर्शन घडविले. टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या घोषात आणि अभंगांच्या सुरावटीत शालेय परिसरासह गावागावांत भक्तिमय वातावरण निर्माण झाले. ग्रामस्थांनीही या दिंडींचे उत्साहात स्वागत करत बालवारकऱ्यांना प्रोत्साहन दिले.



लोणी येथील प्राथमिक शाळेच्या शिक्षिका राजश्री मोटे यांनी सांगितले की, लहान वयातच मुलांना भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेची ओळख करून दिल्यास त्यांच्यामध्ये नामस्मरण, भजन-कीर्तनाची आवड निर्माण होते. याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर आणि पुढील आयुष्यात सकारात्मक परिणाम होतो, असे त्यांनी नमूद केले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या दिंडी सोहळ्यांमुळे लोणी-धामणी परिसरात भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेचे सुंदर दर्शन घडत आहे.

# ११ वर्षांनंतर मॅगीला मोठा दिलासा; ‘असुरक्षित’ ठरविणाऱ्या प्रयोगशाळेलाच न्यायालयाने फेटाळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डेहराडून :** देशभरात २०१५ मध्ये प्रचंड वाद निर्माण करणाऱ्या ‘मॅगी २-मिनिट नूडल्स’ प्रकरणात उत्तराखंड उच्च न्यायालयाने २० जुलै २०२६ रोजी नेस्ले इंडिया लिमिटेडला मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने मॅगीविरोधातील फौजदारी कारवाई रद्द करत, संपूर्ण खटल्याचा पाया ठरलेल्या अन्न विश्लेषण अहवालालाच कायदेशीरदृष्ट्या अस्थिर आणि ग्राह्य धरता येणार नाही असे स्पष्ट केले. या निर्णयामुळे केवळ मॅगी प्रकरणच नव्हे, तर सरकारी तपास यंत्रणा, प्रयोगशाळांची गुणवत्ता आणि अन्नसुरक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

न्यायमूर्ती आलोक महरा यांनी दिलेल्या निर्णयात नमूद केले की, उत्तराखंडमधील रुद्रपूर येथील राज्य अन्न व औषध परीक्षण प्रयोगशाळेने २०१५ मध्ये तपासलेले नमुने कायद्याने आवश्यक असलेल्या निकषांनुसार तपासले असल्याचे सिद्ध झाले नाही. संबंधित प्रयोगशाळा राष्ट्रीय परीक्षण आणि अंशांकन प्रयोगशाळा मान्यता मंडळ (एनएबीएल) मान्यताप्राप्त असल्याचा कोणताही पुरावा न्यायालयासमोर सादर करण्यात आला नाही. तसेच अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ च्या कलम ४३ अंतर्गत आवश्यक अधिकृत मान्यताही त्या प्रयोगशाळेला मिळालेली नव्हती. त्यामुळे त्या प्रयोगशाळेच्या अहवालावर आधारित संपूर्ण फौजदारी कारवाई कायदेशीरदृष्ट्या टिकू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

हे प्रकरण मे २०१५ मध्ये उत्तराखंडमध्ये मॅगीचे नमुने गोळा केल्यानंतर सुरू झाले होते. त्या वेळी राज्य प्रयोगशाळेने मॅगीला चुकीच्या लेबलसह विकली जात आहे आणि असुरक्षित असल्याचे म्हटले होते. त्यानंतर नेस्ले इंडिया आणि विक्रेत्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. हेच प्रकरण देशभर गाजलेल्या मॅगी वादाचा भाग होते. त्या काळात भारतीय अन्न सुरक्षा



आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) मॅगी बाजारातून मागे घेण्याचे आदेश दिले होते.

मात्र, पुढे मुंबई उच्च न्यायालयाने या आदेशांवर आक्षेप घेत मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये नव्याने चाचण्या करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर झालेल्या तपासण्या तसेच मैसूर येथील केंद्रीय अन्न तंत्रज्ञान संशोधन संस्थेने (सीएफटीआरआय) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केलेल्या चाचण्यांमध्ये मॅगीचे नमुने निर्धारित निकषांनुसार सुरक्षित असल्याचे आढळले.

नेस्लेने न्यायालयात असा युक्तिवाद केला की, मोनोसोडियम ग्लुटामेट (एमएसजी) संदर्भातील आरोपही चुकीचे होते. एफएसएसएआयने स्वतः स्पष्ट केले होते की, केवळ ग्लुटामेट आढळल्यामुळे उत्पादकाने कृत्रिम एमएसजी मिसळले आहे, असे गृहित धरता येत नाही. अनेक अन्नपदार्थांमध्ये ग्लुटामेट नैसर्गिकरित्या आढळते आणि नैसर्गिक व कृत्रिम ग्लुटामेट यामधील फरक निश्चित करणारी वैज्ञानिक चाचणी उपलब्ध नाही. शिवाय, नेस्लेच्या उत्पादन केंद्राच्या तपासणीत उत्पादन प्रक्रियेदरम्यान एमएसजी मिसळले जात नसल्याचेही आढळले होते.

न्यायालयाने आणखी एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. कंपनीविरुद्ध खटला चालविण्याच्या प्रक्रियेत मंजुरी, वेळेची मर्यादा आणि कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधींवरील कारवाईसंबंधी अनेक कायदेशीर त्रुटी असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे संपूर्ण खटल्यालाच धक्का बसत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

या निर्णयामुळे अन्नसुरक्षा यंत्रणेपुढे अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. जर एखाद्या उत्पादनावर बंदी घालण्याचा किंवा फौजदारी कारवाई करण्याचा आधारच कायदेशीरदृष्ट्या सक्षम नसलेल्या प्रयोगशाळेच्या अहवालावर असेल, तर अशा कारवाईमुळे उद्योग, ग्राहक आणि न्यायव्यवस्थेवर काय परिणाम होऊ शकतो,

याचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. अन्नसुरक्षेच्या नावाखाली कठोर कारवाई करणे आवश्यक असले तरी ती वैज्ञानिकदृष्ट्या अचूक, कायदेशीरदृष्ट्या वैध आणि पारदर्शक प्रक्रियेवर आधारित असणे तितकेच महत्त्वाचे आहे.